Indian Streams Research Journal

# नागपूर जिल्ह्यातील महिलांच्या विकासात महिला सहकारी पतसंस्थांचे योगदान– एक विश्लेषणात्मक अध्ययन (कालावधी 1996 ते 2006)

कु. मेघा ज्ञानेश्वर खोब्रागडे[1] , डॉ.राजीव सातोकर [2]
[1]संशोधनकर्ती
[2]मार्गदर्शक , एम.कॉम.,एम.फील.,पीएच.डी.
प्राचार्य, नबीरा कॉलेज, काटोल.

## सारांश

आज बहुतेक ग्रामीण आणि शहरी भागात विशेषतः कष्टकरी महिला, झोपडपट्टीतील महिला यांना त्यांच्यामधील सुप्त गुणवैशिष्ट्यांच्या आधारे, त्यांच्या प्रयत्नामुळे त्या ग्रामीण व नागरी समाजात आर्थिकदृष्ट्याा सक्षम होऊन, परावलंबाच्या परंपरेतून बाहेर येण्याचा एक नवीन मार्ग 'महिला सहकारी पतसंस्थेमुळे' त्यांना मिळाला आहे. सर्वसामान्य परिस्थितीत असलेल्या महिलांना आर्थिक मदत करण्यासाठी महिला सहकारी पतसंस्थांची स्थापना झालेली असते आणि या पतसंस्थेद्वारे महिला सभासदांना कर्जाच्या स्वरूपात पैसा प्राप्त करता येतो. महिला सहकारी पतसंस्थेमुळे बचत व काटकसरीच्या कामाला चालना मिळून कर्जविषयक गरज भागविली जाते. तसेच लघुउद्योग, कुटीरउद्योग व स्वयंरोजगाराला देखील कर्जपुरवठा प्राप्त होण्यास मदत होते. त्यामुळे महिलांच्या विकासात महिला सहकारी पतसंस्था हे विकासाचे एक साधन बनत आहे. महिलांचा आत्मविश्वास व आत्मनिर्भरता वाढत आहे. व्यापारी बँका मोठ्या कर्जदारांसाठी ज्या सेवा पुरवितात त्या सर्व सेवा महिलांसाठी महिला सहकारी पतसंस्थांनी पुरवाव्यात आणि त्यातून स्वतःचा विकास घडवून आणावा, यासाठी देखील या पतसंस्थांचे अध्ययन महत्वपूर्ण वाटते.



महिला सहकारी पतसंस्थांची स्थापना करून महिलांचा विकास त्याद्वारे होऊ शकतो, यावर संशोधकाला ठाम विश्वास आहे आणि म्हणूनच महिलांच्या विकासात महिला सहकारी पतसंस्थांचे योगदान तपासून पाहण्यासाठी प्रस्तुत विषयाची निवड केली आहे.

## प्रस्तावना

स्वातंत्र्योत्तर काळात महिलांच्या विकासासाठी जाणीवपूर्वक प्रयत्न करण्यात आलेले असले, तरी अपेक्षित यश प्राप्त झालेले नाही. सर्व यशापयश आर्थिक समस्यांच्या स्वरूपावर अवलंबून असते, सर्व समस्यांचे मूळ आर्थिक असते. समाजात आर्थिक सुबत्ता आली तर समाजात स्थान प्राप्त होते, परंतु समाजात महिला घटक उपेक्षित आहे. त्यांच्या गुणांची, कष्टाची, कदर घ्यावीशी वाटत नाही. ती आयुष्यभर मुलगी, पत्नी, आई या स्वरुपात जीवन कंठीत असते. ती अहोरात्र कबाडकष्ट करते, लहान मोठ्यांची काळजी करण्यात आयुष्य घालविते. परंतु स्त्री घटकाचा मान कोणीही ठेवत नाही, याचे मूळ कारण आर्थिक आहे. म्हणून महिलांना आर्थिकदृष्ट्याा स्वावलंबी बनविणे अत्यावश्यक आहे.

महिलांच्या कल्याणासाठी शासनाने अनेक योजना कार्यान्वित केल्या आहेत. सबलीकरणावर भर देऊन पुरुष व स्त्रिया यांच्यात सर्व बाबतीत समानता प्रस्थापित करण्याच्या उद्देशाने स्वयंसहाय्यता समूह चळवळ जोमाने सुरू आहे. महिलांचे दारिद्र्या, वर्षानुवर्षे चालत आलेल्या परंपरा, रूढी, चालीरिती यामुळे महिलांची स्थिती खालावलेली आहे. तसेच असंघटितपणा, शिक्षणाचा अभाव, रोजगार व आरोग्य यांचा अभाव, यामुळे देखील दारिद्र्या वाढलेले आहे. यासाठी महिलांच्या दृष्टीने संघटित होऊन परिणामकारक काम करण्याचे महत्त्वाचे शस्त्र म्हणजे 'महिला सहकारी पतसंस्था' होय.

महिला सहकारी पतसंस्था सहकारी तत्त्वाच्या आधारे कार्य करतात. महिला सभासदांकडून ठेवी स्वीकारून त्या ठेवीतून माफक व्याज दराने कर्जपुरवठा करीत असतात. या व्यतिरिक्त महिला सहकारी पतसंस्था लघुउद्योग, गृहउद्योग व स्वयंरोजगार वृद्धिंगत होण्यासाठी कर्जपुरवठा करीत असतात. महिला सभासदांना आर्थिक साहाय्य करून औद्योगिक विकासात हातभार लावतात व इतर गरजा पूर्ण करण्याची महत्त्वाची भूमिका बजावतात. त्यामुळे महिलांच्या विकासावर महिला सहकारी पतसंस्थांचा प्रभाव पडलेला दिसून येतो. महिला सहकारी पतसंस्थेमुळे महिलांच्या वैयक्तिक, सामाजिक, आरोग्यदृष्ट्याा व आर्थिक प्रश्नांची सोडवणूक करणे सहज शक्य होते. त्यामुळे महिलांचा विकास महिला सहकारी पतसंस्थेच्या माध्यमातून होण्यास हातभार लागत आहे.

महिलांमधील अंगीभूत असणाऱ्या क्षमतांना आकार देण्यासाठी व महिला सहकारी पतसंस्थेच्या मजबुतीकरणासाठी हे संशोधन प्रबोधनात्मक ठरेल अशी अपेक्षा आहे.

### संकल्पनांचे स्पष्टीकरण :

संशोधनांतर्गत अध्ययनाच्या विषयामध्ये समाविष्ट संकल्पनांचे स्पष्टीकरण खालीलप्रमाणे आहे.

### 1) महिला :

महिला म्हणजे जिच्या अंगी निर्णय घेण्याची, नियंत्रण करण्याची, संघटित करण्याची क्षमता तसेच मतप्रदर्शन करणे, कृतिशील कार्यक्रम घडवून आणणे, लोकसंपर्क, जनसंपर्क, संस्थासंपर्क, आर्थिक व्यवहार, काटकसर इ. गुण असणारी नारी.

### 2) विकास :

स्त्रीने स्वतःच्या क्षमतांची ओळख करून घेऊन, घरगुती व सामाजिक निर्णयांच्या प्रक्रियेत सहभागी होण्याचा प्रयत्न.

### 3) सहकार :

अनेकांनी एकत्र येऊन एखादे काम करण्याची पद्धत.

### 4) सहकारी पतसंस्था :

महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम 1960 अन्वये नोंदणी करण्यात आलेली अथवा नोंदणी करावयाची सहकारी संस्था. सभासदांची गरज लक्षात घेऊन त्यानुसार त्यांना कर्जपुरवठा करणाऱ्या संस्था.

### 5) महिला सहकारी पतसंस्था :

महिलांनी स्वेच्छेने एकत्रित येऊन आपला आर्थिक विकास साधण्याच्या उद्देशाने परस्पर साहाय्य व सहकाराच्या आधारे निर्माण केलेले संघटन.

### संशोधनाची उद्दिष्टे :

1) महिलांच्या आर्थिक विकासात महिला सहकारी पतसंस्थांच्या सहभागाचा अभ्यास करणे.
2) महिला सहकारी पतसंस्थांचा महिला उद्योजकतेच्या विकासात असणाऱ्या योगदानाचा अभ्यास करणे.

**सारणी क्र.1 महिलांच्या सर्वांगीण विकासात महिला सहकारी पतसंस्थांचे योगदान**

| अ.क्र. | Paired t मूल्य | | सरासरी | एकूण स्त्रिया |
|---|---|---|---|---|
| 1 | समाजिक कार्यातील सहयोग | पतसंस्थेत सहभाग घेण्याअगोदर | 2.81 | 100 |
| | | पतसंस्थेत सहभाग घेतल्यावर | 3.45 | 100 |
| 2 | उत्पादन प्रमाण | पतसंस्थेत सहभाग घेण्याअगोदर | 2.39 | 100 |
| | | पतसंस्थेत सहभाग घेतल्यावर | 3.26 | 100 |
| 3 | आर्थिकदृष्ट्याा स्वयंपूर्णता | पतसंस्थेत सहभाग घेण्याअगोदर | 2.59 | 100 |
| | | पतसंस्थेत सहभाग घेतल्यावर | 3.90 | 100 |
| 4 | निर्णय घेण्याची क्षमता | पतसंस्थेत सहभाग घेण्याअगोदर | 2.77 | 100 |
| | | पतसंस्थेत सहभाग घेतल्यावर | 4.02 | 100 |
| 5 | नेतृत्व करण्याची क्षमता | पतसंस्थेत सहभाग घेण्याअगोदर | 2.08 | 100 |
| | | पतसंस्थेत सहभाग घेतल्यावर | 2.77 | 100 |
| 6 | सरासरी सर्वांगीण विकास | पतसंस्थेत सहभाग घेण्याअगोदर | 2.57 | 100 |
| | | पतसंस्थेत सहभाग घेतल्यावर | 3.40 | 100 |

वरील सारणी क्र.1 वरून महिलांच्या सर्वांगीण विकासात महिला सहकारी पतसंस्थांचे योगदान महत्त्वपूर्ण आहे का हे पडताळून पाहण्यासाठी पतसंस्थांचे सदस्य असणाऱ्या 100 महिलांना त्यांचे पतसंस्थेत सहभाग घेण्या अगोदर तसेच पतसंस्थेत सहभाग घेतल्यावर चे मत विचारण्यात आले. त्यांचा पतसंस्थेत सहभाग घेतल्यावर सरासरी सामाजिक कार्यातील सहयोग 3.45, कौटुंबिक उत्पादन प्रमाण 3.26, आर्थिकदृष्ट्याा स्वयंपूर्णता 3.90, निर्णय घेण्याची क्षमता 4.02, नेतृत्त्व करण्याची क्षमता 2.77 व त्यावरून झालेला सर्वांगीण विकास 3.40 सरासरी वरील सारणी दर्शविते.

### निष्कर्ष,

नागपूर जिल्ह्यातील महिलांच्या सर्वांगीण विकासात महिला सहकारी पतसंस्थांचे योगदान महत्वपूर्ण आहे की नाही हे पडताळण्यासाठी सांख्यिकीय Paired t मूल्य काढण्यात आले त्यावरून निघालेले निष्कर्ष हे संशोधन तसेच अभ्यासासाठी फार महत्त्वाचे आहेत.

अ) महिला सहकारी पतसंस्थेचे सभासद झाल्यावर त्यांचा इतरही सामाजिक कार्यात सहभाग पहिलेपेक्षा वाढला.
ब) महिला सहकारी पतसंस्थेचे सभासदत्व स्वीकारल्यामुळे कौटुंबिक उत्पादनात महत्वपूर्ण वाढ आढळली.
क) महिला सहकारी पतसंस्थांच्या योगदानामुळे सदस्य महिलांमध्ये आर्थिकदृष्ट्याा स्वयंपूर्णता आढळून आली.
ड) महिला सहकारी पतसंस्थांच्या योगदानामुळे सदस्य महिलांमध्ये निर्णय घेण्याच्या क्षमतेत वाढ झालेली आढळून आली.
इ) महिला सहकारी पतसंस्थांच्या योगदानामुळे सदस्य महिलांमध्ये कुठल्याही प्रकारचे नेतृत्व करण्याच्या क्षमतेत वाढ झालेली आढळून आली.
ई) एकूण सर्वांगीण विकासातच सांख्यिकीय दृष्ट्याा धनात्मक फरक आढळून आला.

## संदर्भ ग्रंथ सूची


- जरारे विजय लक्ष्मण, 2004, संशोधन प्रणाली, अद्वैत प्रकाशन, अकोला.
- कऱ्हाडे बी. एम. 2007, शास्त्रीय संशोधन पध्दती, पिंपळापुरे ॲण्ड कं. पब्लीशर्स, नागपूर.
- घाटोळे रा.ना., 2003, समाजशास्त्रीय संशोधन – तत्वे व पध्दती, मंगेश प्रकाशन, नागपूर .
- आगलावे प्रदिप, 2000, संशोधन पध्दतीशास्त्रे व तंत्रे, विद्या प्रकाशन, नागपूर .
- भांडारकर पु. ल., सामाजिक संशोधन पध्दती, महाराष्ट्र विद्यापीठ ग्रंथनिर्मिती मंडळ, नागपूर .
- गुप्ते ए.के., 1997, महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम 1960 व महाराष्ट्र सहकारी संस्था नियम, 1961, मुकुंद प्रकाशन, ठाणे.
- जोशी व. शं., जोशी प.व., कायमखाने ली. कृ., 1994, सहकारी संस्था अधिनियम, 1960, न्यायदीप प्रकाशन, पुणे – 16.
- नंदा अमित, 2015, महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम, 1960, करंट पब्लिकेशन्स, मुंबई 400002.
- नागरी / ग्रामीण बिगर शेती सहकारी पतसंस्थांसाठी सुधारित आदर्श – उपविधी, 2003, ललित गांधी, महाराष्ट्र राज्य सहकारी पतसंस्था फेडरेशन लि. मुंबई, प्रशासकीय कार्यालय, – ताराराणी चौक, कोल्हापूर, 416002.
- कामत गो. स., मेमोरिया सी.बी., 1975, सहकार तत्व आणि व्यवहार, किताब महल, 15 थार्नहिल रोड, औरंगाबाद.
- जाधव बी.एस., 1999,सहकारी बँका व पतसंस्था कर्जपुरवठा : एक दृष्टीकोन,जामदार प्रकाशन, सातारा.
- महाजन मुकुंद, 1996, सहकार चळवळ, निराली प्रकाशन, पुणे.